नि.फौ.ख.नं.३७४/२०२२

निशाणी क्र. ४१

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,

**माझे नाव - शिवानी अजय रांधवण,**

वय - २४ वर्षे, व्यवसाय – शिक्षण,

रा. इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**सरतपास सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती एम.ए.काळे यांच्यामार्फत शपथेवर सुरु-**

**१.** माझे लग्न दि.३०/०३/२०२१ रोजी आरोपी क्र.१ सोबत झाले. माझे लग्न माझ्या मावशीच्या घरी माळेगाव येथे झाले. माझे लग्न माझी आई, मावशी व काका यांनी केले. माझ्या लग्नाचा अंदाजे खर्च पाच ते सात लाख रु. झाला व तो खर्च माझ्या आईने व मावशीने केला. मला वडिल व भाऊ नाहीत. लग्नानंतर मी आरोपीच्या घरी भिगवण स्टेशन येथे राहायला गेले. आरोपीच्या घरी त्याचे आई-वडिल, भाऊ व आजी असे राहत होते.

**२.** आरोपीने मला एक महिना व्यवस्थित नांदविले व त्यानंतर घर बांधण्यासाठी पैशाची मागणी केली व हाणमार सुरु केली. आरोपी क्र.२ छाया माझी सासु, आरोपी क्र.३ तानाजी माझे सासरे व आरोपी क्र.४ अक्षय माझा दीर आहे. आज ते सर्व कोर्टात हजर आहेत. सर्व आरोपींनी माझ्याकडुन रक्कम रु. १० लाखाची मागणी केली होती. आरोपी मला घालून-पाडून बोलायचे, उपाशी ठेवायचे. माझे नातेवाईक निशा शेखर माळशिखारे यांच्यामार्फत मी माझ्या घरच्यांना मला होणाऱ्या त्रासाबाबत सांगितल्यानंतर माझ्या घरचे माझ्या सासरी आले. मी निशा यांना त्या मला भेटायला आल्यानंतर मला होणाऱ्या त्रासाविषयी सांगितले होते. माझ्या सासरी माझी आई, मावशी व काका आले होते. माझ्या घरच्यांनी आरोपींना समजावून सांगितले की, आमची आर्थिक परिस्थिती चांगली नाही, आत्ताच लग्नाचा खर्च झाला आहे. त्यामुळे आम्हाला पैसे देता येणार नाहीत. माझ्या घरच्यांनी समजावून सांगुन देखील आरोपी मला त्रास देत होते. आरोपींनी मला मारहाण, शिवीगाळ, उपाशी ठेवणे असा त्रास दिला. त्यानंतर दिवाळीच्या वेळी मला माहेरी पाठवून दिले. त्यानंतर आरोपी मला परत न्यायला आले नाहीत. म्हणून मी तक्रार दाखल केली. मला आता तक्रार दाखविली. त्यावर माझी सही आहे. तसेच, प्रथम खबर अहवालावर माझी सही आहे. त्या दोन्हींतील मजकुर खरा व बरोबर आहे. तक्रारीला **निशाणी ४२** व प्रथम खबर अहवालाला **निशाणी ४३** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री.एम.एम.देवकाते यांचेमार्फत शपथेवर सुरु-**

**३.** माझे शिक्षण बी.एस.सी. झाले असुन सद्या ॲडव्हान्स डी.एम.एल.टी. चालू आहे. हे खरे नाही की, मी सद्या लॅब टेक्नीशियन म्हणून काम करते. हे खरे की, मी सद्या माझ्या आईकडे इंदापूरला राहते. हे खरे की, निशिगंधा शेखर माळशिकारे ही माझी मोठी बहिण आहे. हे खरे की, ती विवाहित आहे. हे खरे की, ती देखील सद्या माझ्या आईकडे राहते. हे खरे नाही की, लॅब टेक्नीशियन म्हणून मी काम करत असल्याने त्या पैशावर माझ्या माहेरच्या लोकांचा उदरनिर्वाह होतो.

**४.** हे खरे की, माझ्या विवाहानंतर काही काळ कोविडचा असुन त्यानंतर माझी आई आजारी पडली होती. हे खरे नाही की, माझ्या आईची काळजी घेण्यासाठी माझ्या पतीने मला माझ्या आईकडे सोडले होते. साक्षीदार सांगते माझे पती मला केवळ आईकडे घेऊन गेले होते. हे खरे की, लग्नानंतर सासरी असताना मी एस.वाय.बी.एस.सी. व मुक्त विद्यापिठाचे बी.ए.चे शिक्षण पुर्ण केले. हे खरे की, माझे सासरे अपंग आहेत. हे खरे की, माझे सासरे बऱ्यापैकी शेतातील घरात राहतात व कधीतरी घरी येतात. हे खरे की, लहानपणापासुन माझे शिक्षण व राहणे हे इंदापूर शहरात झाले आहे. भिगवण स्टेशन येथे बाजारपेठ आहे अगर कसे मला माहिती नाही. मी सासरी साधारण आठ महिने राहिले. या आठ महिन्यात मला भिगवण स्टेशन येथे बाजारपेठ दिसली नाही. इंदापूरच्या तुलनेत भिगवण स्टेशन हे छोटे आहे अगर कसे ते मला सांगता येणार नाही. हे खरे की, मी जे आठ महिने सासरी राहिले त्या आठ महिन्यात सर्व आरोपी शेतात काम करायचे. साक्षीदार सांगते माझे पती नोकरीस जायचे. (तुमचे पती नोकरी करतात असे तुम्ही पोलिसांना तक्रार देताना सांगितले नाही असा प्रश्न बचाव पक्षामार्फत विचारण्यात आला. या प्रश्नास सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी हरकत घेतली की, सदरचा मजकूर सरतपासात आला नसल्याने साक्षीदाराचा आधीचा जबाब व न्यायालयासमोर केलेले कथन यात कोणतेही ओमिशन येत नसल्याने सदरचा प्रश्न विचारण्यास परवानगी देण्यात येऊ नये. मा.सर्वोच्य न्यायालयाने तहसिलदार सिंग केसमध्ये निर्णित केल्याप्रमाणे साक्षीदार त्याच्या पुर्वीच्या जबाबाशी विसंगत काही कथन त्याच्या सरतपासात करत असेल तर ते कथन **Contradiction** या सदरात येते. तसेच, साक्षीदार पुर्वीच्या जबाबापेक्षा जादाचे कथन सरतपासात करत असेल तर ते कथन **Improvement** या सदरात येते. सदर साक्षीदाराने उलटतपासात तिच्या पतीच्या नोकरीबाबत कथन केले आहे जे कथन तिने बचाव पक्षामार्फत आरोपी शेतात काम करतात या विचारलेल्या प्रश्नाला

अनुसरुन दिले आहे. त्यामुळे साक्षीदाराने तिच्या पतीच्या नोकरीबाबत तक्रारीत काही कथन करण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. तसेच, साक्षीदाराने सरतपासात देखील तिच्या पतीच्या नोकरीबाबत कोणतेही कथन केले नसल्याने तिचे उलटतपासातील कथन **Improvement** या सदरात येत नाही. त्यामुळे वर नमुद प्रश्न साक्षीदारास विचारण्याची परवानगी फेटाळण्यात येते.)

५. हे खरे नाही की, मी तक्रार देताना पोलिसांना माझ्या लग्नाचा खर्च ५-७ लाख आल्याचे सांगितले होते. हे खरे की, तो मजकुर माझ्या तक्रारीत नमुद नाही. तो मजकुर माझ्या तक्रारीत का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. मी पोलिसांना तक्रार देताना मला वडिल व भाऊ नाहीत हे सांगितले होते. तो मजकुर माझ्या तक्रारीत का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे खरे की, आरोपींच्या घरी त्याचे आजी-आजोबा राहतात हे मी प्रथमतः कोर्टात सांगितले. हे खरे की, मला होणाऱ्या त्रासाबाबत मी निशा माळशिकारे हिला सांगितले ही बाब मी प्रथमच कोर्टात सांगत आहे. हे खरे की, निशाने माझ्या घरच्यांना सांगितल्यावर ते घरी आल्यावर मी मला होणाऱ्या त्रासाबाबत त्यांना सांगितले हे देखील मी प्रथमच कोर्टात सांगत आहे. हे खरे नाही की, माझ्या घरच्यांनी लग्नाला खर्च झाला असल्याने आता पैसे देणे शक्य नाही, असे आरोपींना सांगितले हे मी प्रथमच न्यायालयात सांगितले. हा मजकुर माझ्या फिर्यादीत का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. मी तक्रार देताना दिवाळीच्या वेळी आरोपींनी मा माहेरी पाठविले हे सांगितले होते. तो मजकुर माझ्या तक्रारीत का नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. आरोपी मला परत न्यायला आले नाहीत हे मी तक्रार देताना सांगितले होते. ते तक्रारीत का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

६. माझ्या घरच्यांनी लग्न ठरवताना आरोपींचे पत्र्याचे चांगले घर पाहिले होते. हे खरे की, आरोपी आजही त्याच घरात राहतात. त्या घराव्यतिरिक्त घराच्या बाजूला दुसरे घर बांधण्यासाठी मोकळी जागा आहे अगर कसे मला सांगता येणार नाही. माझ्या लग्नाचा ५-७ लाख रुपये खर्च झाला याचा कागदोपत्री पुरावा म्हणजेच भांड्याच्या पावत्या माझ्याकडे आहेत. हे खरे की, ७ लाख रुपये खर्च आला असे दाखविणारा पुरावा मी न्यायालयात दाखल केला नाही. हे खरे नाही की, आरोपी हे ग्रामीण वातावरणात ग्रामीण पद्धतीने राहत होते. हे खरे नाही की, मी सासरी आठ महिने असताना खरेदीकरिता बारामतीला गेले होते. दि.३०/०४/२०२१ रोजी मी माझ्या नातेवाईकांकडे होते ते मला सांगता येणार नाही.

७. मी सरतपासात कथन केले की, मला आरोपींनी मारहाण, शिवीगाळ व उपाशी ठेवणे असा त्रास दिला त्याबाबत मी पोलिस ठाण्यात तक्रार केलेली नाही. माझी माहेरची परिस्थिती साधारण आहे अगर कसे मला माहिती नाही. हे खरे की, दि.०५/०२/२०२२ रोजी आरोपींनी मला नांदायला येण्यासाठी वकीलांमार्फत नोटीस पाठविली. हे खरे की, मी नोटीस नंतर नांदायला गेले नाही. हे खरे की, आरोपींनी बारामती येथे नांदायला येण्याबाबत अर्ज दाखल केला असुन मी त्यात हजर झाले आहे. हे खरे की, रक्कम रु.१० लाख कोणासमोर व किती तारखेला मागितले ते मला सांगता येणार नाही. हे खरे नाही की, मला आरोपी घालून-पाडून बोलायचे, उपाशी ठेवायचे, मारहाण व शिवीगाळ करायचे हे मी खोटे सांगते. हे खरे नाही की, मी आठ महिने सासरी असताना माझ्या माहेरचे लोक खुशाली विचारायला माझ्या सासरी यायचे. माझ्या माहेरचे लोक कार्यक्रमाच्या वेळी माझ्या सासरी यायचे. हे खरे नाही की, ते जेव्हा सासरी यायचे तेव्हा त्यांचा पाहुणचार व्यवस्थित व्हायचा. हे खरे नाही की, त्यावेळी कधीही वाद व्हायचा नाही. हे खरे नाही की, नवीन लग्न झाल्यावर देवदर्शन व पाहुण्यांकडे जाणे हे मी व माझे पती एकत्र करायचो.

८. हे खरे नाही की, आरोपींचे चुलत भाऊ व सुरेश बिबे हे मला नेण्यासाठी इंदापूर येथे आले होते. हे खरे नाही की, त्यांची माझ्या आईसोबत चर्चा झाली. हे खरे नाही की, भिगवण स्टेशन येथील वातावरण ग्रामीण असल्याने मला तेथे करमत नव्हते. हे खरे नाही की, शिक्षण पुर्ण करुन मला नोकरी करायची होती. हे खरे नाही की, मी सतत असे म्हणायचे की, मला ऐशोआरामात जीवन जगायची सवय आहे मला येथे जमत नाही. हे खरे नाही की, मी सासरी कोणतेही काम करत नव्हते, कोणाशीही बोलत नव्हते व रुसुन बसायचे.

९. संतोष संपत वायसे हे माझे काका आहेत. हे खरे नाही की, माझी खुशाली पाहण्यासाठी ते भिगवणला येत होते. ते माझ्या घरी कार्यक्रमाला यायचे. त्या कार्यक्रमाला माझे पती त्यांना निमंत्रण द्यायचे अगर कसे मला सांगता येणार नाही. हे खरे नाही की, संतोष वायसे हे माझ्या माहेरी कोणत्याही गोष्टीचे मार्गदर्शक असायचे. हे खरे की, दि.०५/११/२०२१ रोजी दिवाळीसाठी माझ्या मामाचा मुलगा मला न्यायला आला होता. हे खरे की, दि.०५/११/२०२१ नंतर मी पुन्हा सासरी गेले नाही. हे खरे नाही की, मी माहेरी असताना आरोपींनी माझ्या आईला संपर्क केला असता माझ्या आईने असे सांगितले की, माझ्या मुलीला ऐशोआरामात रहायची सवय आहे, तुमचे घर साधारण आहे, स्वयंपाकासाठी एखादी कामवाली ठेवा म्हणजे माझी मुलगी तेथे येईल. हे खरे नाही की, मी माहेरी असताना आरोपी क्र.१ मला

न्यायला आला होता. हे खरे नाही की, मी माहेरी असताना माझ्या आईने सुरेश बिबे, विजय रांधवण व आरोपी क्र.१ यांना अपशब्द बोलून घालवून दिले.

**१०.** हे खरे नाही की, माझ्या सरतपासातील "आरोपीने मला एक महिना व्यवस्थित नांदविले व त्यानंतर घर बांधण्यासाठी पैशाची मागणी केली व हाणमार सुरु केली. आरोपी क्र.२ छाया माझी सासु, आरोपी क्र.३ तानाजी माझे सासरे व आरोपी क्र.४ अक्षय माझा दीर आहे. आज ते सर्व कोर्टात हजर आहेत. सर्व आरोपींनी माझ्याकडुन रक्कम रु. १० लाखाची मागणी केली होती. आरोपी मला घालून-पाडून बोलायचे, उपाशी ठेवायचे. माझे नातेवाईक निशा शेखर माळशिखारे यांच्यामार्फत मी माझ्या घरच्यांना मला होणाऱ्या त्रासाबाबत सांगितल्यानंतर माझ्या घरचे माझ्या सासरी आले. मी निशा यांना त्या मला भेटायला आल्यानंतर मला होणाऱ्या त्रासाविषयी सांगितले होते. माझ्या सासरी माझी आई, मावशी व काका आले होते. माझ्या घरच्यांनी आरोपींना समजावून सांगितले की, आमची आर्थिक परिस्थिती चांगली नाही, आत्ताच लग्नाचा खर्च झाला आहे. त्यामुळे आम्हाला पैसे देता येणार नाहीत. माझ्या घरच्यांनी समजावून सांगुन देखील आरोपी मला त्रास देत होते. आरोपींनी मला मारहाण, शिवीगाळ, उपाशी ठेवणे असा त्रास दिला. त्यानंतर दिवाळीच्या वेळी मला माहेरी पाठवून दिले. त्यानंतर आरोपी मला परत न्यायला आले नाहीत.” हा संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे खरे नाही की, मी सासरी असताना माझा दीर शिक्षणासाठी बाहेरगावी रहायचा. हे खरे नाही की, आरोपींनी मला शारिरिक, मानसिक व आर्थिक त्रास दिलेला नाही. हे खरे नाही की, मी आरोपी क्र.१ चा त्याग केला व त्याला मानसिक त्रास दिला. हे खरे नाही की, माझ्या नोकरीच्या पैशातून आईचा उदरनिर्वाह व्हावा म्हणून मी पतीला सोडून आईकडे राहते. हे खरे नाही की, आरोपींनी माझ्याकडे पैशाची मागणी केली नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

PRAJKTA RAJEEV SABNIS
Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2025.02.01 16:18:11 +0530

**(प्राजक्ता राजीव सबनीस)**

**दि.०१/०२/२०२५**

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर,**
**ता.इंदापूर, जि.पुणे.**